सायबर सुरक्षेची क्रांती आता गावाच्या पातळीवर! 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमांतर्गत पांजरी (लोढी) गावात सायबर जनजागृती अभियान

Posted on September 16, 2026 by Prakaash Khilare




सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत पांजरी (लोढी) येथे Team G5 कडून ऑनलाइन फसवणूक, OTP, UPI, फिशिंग आणि डिजिटल अरेस्टबाबत जनजागृती; ग्रामस्थांचे सायबर जागरूकता सर्वेक्षणही करण्यात आले.

नागपूर ग्रामीण भागातील पांजरी (लोढी) गावात सायबर सुरक्षेचा संदेश; कुणाल मेश्राम व ऋतुजा गिरी यांनी ग्रामस्थांना ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी मार्गदर्शन केले.


सायबर गुन्ह्यांविरोधातील जनजागृती आता शहरांपुरती मर्यादित न राहता थेट ग्रामीण भागाच्या मुळापर्यंत पोहोचली आहे. **Quick Heal Foundation** यांच्या पुढाकाराने आणि **Government Institute of Forensic Science, Nagpur** यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या '**Cyber Shiksha for Cyber** *Suraksha*' या उपक्रमाने आता ग्रासरूट स्तरावर प्रवेश केला आहे.

या उपक्रमांतर्गत **Team G5** मधील **कुणाल मेश्राम आणि ऋतुजा गिरी** यांनी नागपूरच्या ग्रामीण भागातील **पांजरी (लोढी)** गावात विशेष सायबर जनजागृती अभियान राबविले. या अभियानाचा उद्देश ग्रामीण नागरिकांना वाढत्या ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारांची माहिती देणे आणि डिजिटल व्यवहार करताना आवश्यक असलेल्या सुरक्षिततेच्या उपायांची जागरूकता करून देणे हा होता.



अभियानादरम्यान सायबर जागरूकता ऑनलाइन आर्थिक फसवणूक, फिशिंग, OTP/UPI संबंधित फसवणूक, बनावट कॉल व संदेश, सोशल मीडिया फ्रॉड, बनावट लिंक, डिजिटल अरेस्टच्या नावाने होणारी फसवणूक, बनावट KYC/बँक अपडेट संदेश तसेच हॅक झालेल्या सायबर गुन्ह्यांपासून सावध राहण्याबाबत माहिती देण्यात आली.

तसेच, संशयास्पद कॉल, मेसेज किंवा ऑनलाइन व्यवहाराच्या वेळी कोणती काळजी घ्यावी, वैयक्तिक व बँकिंग माहिती कोणासोबत शेअर करू नये आणि फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. नागरिकांना सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये **1930 हेल्पलाइन** आणि **cybercrime.gov.in** या माध्यमातून तक्रार करण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.



गावातील सायबर जागरूकतेचा सर्वेक्षणातून आढावा

जनजागृती अभियानासोबतच Team G5 ने पांजरी (लोढी) गावात सायबर जागरूकता सर्वेक्षण देखील केले. विविध वयोगटातील ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या ऑनलाइन व्यवहार, डिजिटल वापराबाबतची माहिती, सायबर फसवणुकीविषयीची जाणीव, ऑनलाइन सुरक्षिततेच्या सवयी आणि फसवणुकीच्या प्रसंगी कोणती पावले उचलावी याबाबतचा आढावा घेण्यात आला.

या सर्वेक्षणामुळे ग्रामीण भागातील सायबर जागरूकतेची सद्यस्थिती समजून घेण्यास तसेच भविष्यातील जनजागृती उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.

"शहरापासून गावापर्यंत, प्रत्येक नागरिक डिजिटदृष्ट्या सुरक्षित असावा" या उद्देशाने Team G5 ने राबविलेल्या या उपक्रमातून 'Cyber Shiksha for Cyber Suraksha' या उपक्रमाने आपली वाटचाल खऱ्या अर्थाने ग्रासरूट स्तरापर्यंत पोहोचवली आहे.

MISSION CYBER KAVACH

"माझं गाव, सायबर सुरक्षित गाव!"

पांजरी (लोढी) गावातील या अभियानातून गावकऱ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, गावाला सायबर-सुरक्षित गावाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे नेण्यात आले आहे.

Prakaash Khilare

प्रकाश खिलारे हे स्थानिक समाचार डिजिटल मीडिया चे सहसंपादक असून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि स्थानिक घडामोडींवरील बातम्यांचे वृत्तांकन करतात. जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, स्थानिक पातळीवरील गुन्हेगारी घटनांची अचूक माहिती वाचकांपर्यंत पोहोचवणे आणि निष्पक्ष पत्रकारितेचा सामान्यजन समाजाची जोडलेले राहणे हे त्यांच्या लेखनाचा मुख्य उद्देश आहे. डिजिटल पत्रकारितेच्या माध्यमातून ते विविध विषयांवर सखोल आणि प्रभावी बातम्या प्रकाशित करतात. आपण आपल्या परिसरातील बातम्या, माहिती त्वरेने लेख देण्याकरिता संपर्क करू शकतात.....

मो. 9112225235

Email- prakaashkhilare@gmail.com

Posted in Quick Heal Foundation, नागपूर जिल्हा, विदर्भ, शिक्षण, सायबर सुरक्षा जनजागृती

Tagged cybercrime.gov.in, Prakaash Khilare, ऋतुजा गिरी, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, ऑनलाइन फसवणूक, ओटीपी फसवणूक, कुणाल मेश्राम, क्विक हील फाऊंडेशन, ग्रहनिर्मिट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स नागपूर, ग्रामीण सायबर सुरक्षा, टीम G5, डिजिटल अरेस्ट फसवणूक, नागपूर, नागपूर ग्रामीण, नागपूर जिल्हा, नागपूर तालुका, पांजरी (लोढी), पांजरी लोढी गाव, फिशिंग फसवणूक, बँक फ्रॉड, बनावट केवायसी, बनावट कॉल, बनावट लिंक, बनावट सेटिंग, महाराष्ट्र सायबर सुरक्षा, मिशन सायबर कवच, यूपीआय फसवणूक, सायबर क्राईम हेल्पलाइन 1930, सायबर गुन्हे, सायबर जनजागृती, सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा, सायबर सुरक्षा, सायबर सुरक्षित गाव, सोशल मीडिया फ्रॉड